# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.२९/०५/२०१९
## दि.२८/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे १९९/१९,भादविक ३०७,३२३,५०४,३४ |
| **फिर्यादी** | बब्बा राजोडीया,वय-५६ वर्षे,रा.खडकी रेल्वे स्टेशन रोड,खडकी,पुणे |
| **आरोपी** | संतोष बाळासाहेब दुर्वे,वय-३८,रा.लिंबुरी वस्ती,पिंपळे-गुरव,पुणे (अटक) व इतर एक |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०५/२०१९ रोजी १७/२० वा.चे दरम्यान बगंला नं.२५/२,सर्व्हन्ट कॉर्टर गेटच्या समोरील रेल्वे पटरीवर खडकी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे घरी धुणी-भांडी करणारी कामगार बाई हिचे घरी जावुन तु उदया कामाला लवकर ये असे सांगुन,परत त्यांचे राहते घरी येत असतांना,यातील नमुद इसम संतोष बाळासाहेब दुर्वे याने फिर्यादीस अपशब्द वापरून त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण केली. फिर्यादी हे प्रतिकार करीत असतांना,सदर इसमाने त्यांचे जवळील चाकु सारख्या हत्यारांने फिर्यादी यांचे मानेवर वार करुन,त्यांना गंभीर जखमी करुन,फिर्यादी यास जीवे मारण्यांचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एच.आर.ठाकुर ८४२४८५२७७४ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १८५/१९,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | ओंकार जोशी,वय-२८ वर्षे,रा.कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२४/०५/२०१९ रोजी दुपारी १६/०० वा.ते दि.२८/०५/२०१९ रोजी १४/०० वा.चे दरम्यान ए-२०३,कृष्णसागर सोसायटी लेन नं.४,महात्मा सोसायटी कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण ४,७७,०००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) एस.एस.खटके ७५८८२३५८४४ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोथरूड पो स्टे १८६/१९,भादविक ४५७,३८० |
| **फिर्यादी** | सागर शिंदे,वय-३२ वर्षे,रा.शिवतीर्थनगर,कोथरुड,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०५/२०१९ रोजी रात्रौ ०२/४५ वा.ते ०३/१५ वा.चे दरम्यान तोरणा सोसायटी फलॅट नं.एच-७ ,स्टेट बँक स्टाफ कॉलनी,शिवतीर्थनगर,कोथरुड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण १,०३,३००/- रु किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.बी.पडवळे ७०६६२८५६५६ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ३९३/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | अक्षय ठाकुर,वय-२१ वर्षे,रा.पर्वती दर्शन,पुणे |

**आरोपी** हणिनीनाथ दशरथ ढगारे,वय-२७ वर्षे,रा.कात्रज,न-हेगाव,पुणे (अटक)

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०५/२०१९ रोजी ०७/२० वा.कात्रज पी.एम.टी. बस स्टॅन्ड कात्रज,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचे वडील राजेश चिन्नु ठाकुर,वय-४७ वर्षे,रा.३८/३,पर्वती दर्शन, कात्रज, पुणे हे पायी जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील पीएमपीएमएल बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन, नमुद ठिकाणी राजेश चिन्नु ठाकुर यांना जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.एस.लाड ९७६४००२८४१

५

**पो.स्टे.गुरनं./कलम** कोंढवा पो स्टे ४६७/१९,भादविक ३२६,३२३,४५२,१४३,१४७,१४८,१४९,आर्म ॲक्ट ४(२५) महा.पो.का.क.३७(१)१३५

**फिर्यादी** बरकत खान,वय-४५ वर्षे,रा.आझफनगर,कोंढवा-बुद्रुक,पुणे

**आरोपी** १.तौसीफ मेहबुब शेख,वय-२८ २.सद्दाम खुदबुदीन शेख,वय-२१ ३.शोएब मुनाफ शेख,वय-२२ ४.मोहसीन मेहबुब शेख,वय-३० ५.मोहंमद मेहबुब शेख,वय-२२ (अटक) व इतर एक

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०५/२०१९ रोजी २३/४५ वा.लमरा टॉवर बिल्डींग,साई सर्व्हिसचे मागे,कोंढवा-बुद्रुक, पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी यांचा भाचा सोहेल शेख याचेसोबत झालेल्या वादाचा राग मनात धरुन, यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांचे डोक्यामध्ये कोयत्याने वार करुन त्यांना जखमी केले. तसेच सोहेल यांचे हातावर कोयत्याने वार करुन,त्यास गंभीर जखमी केले. तसेच फिर्यादी यांची बहीण यांना हाताने व पायाने मारहाण केली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एस.एस.काळे ८८८८१८१७७७

६

**पो.स्टे.गुरनं./कलम** चतुःश्रृंगी पो स्टे ५०२/१९,भादविक ३२६,३२३,५०६,१४३,१४७,१४९

**फिर्यादी** लक्ष्मण जाधव,वय-२३ वर्षे,रा.औंध गाव,पुणे

**आरोपी** सहा अनोळखी इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२६/०५/१९ रोजी २३/३० वा. गोविळकर स्कुलच्या गेट जवळ,औंध गाव,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे त्यांचा मित्र शिवकुमार देशपांडे याचेसह दुचाकीवरुन जात असताना, यातील नमुद अनोळखी सहा इसमांनी दि.०४/०५/२०१९ रोजी केलेल्या तक्रारीचा राग मनात धरुन,त्यांना हाताने मारहाण करुन,तुम्हास पाहुन घेतो अशी धमकी देवुन,फिर्यादी यांचे डोक्यात दगड मारुन गंभीर जखमी केले आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. व्हि.एम.कोळी ७३३६०८०१००

७

**पो.स्टे.गुरनं./कलम** खडकी पो स्टे १९६/१९,भादविक ३७९

**फिर्यादी** अनिल इंगळे,वय-४८ वर्षे,रा.खडकी,पुणे

**आरोपी** अज्ञात इसम

**गु.घ.ता.वेळ व ठिकाण** दि.२७/०५/२०१९ रोजी २१/१० वा. टिकाराम चौक,कल्पेश ज्वेलर्स समोर सार्वजनिक रोडवर खडकी,पुणे येथे

**तपशिल** यातील फिर्यादी हे नमुद ठिकाणी पथारीवर लेडीज पर्सची विक्री करीत असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी यांचे शर्टावर घाण टाकुन,त्यानंतर त्यांना तुमच्या शर्टवर घाण पडली आहे असे सांगुन,फिर्यादी हे त्यांचा शर्ट साफ करीत असताना,फिर्यादी यांनी त्यांचे बाजुला हातगाडीवर ठेवलेली ७०,०००/-रुपये रोख असलेली पर्स व मोबाईल फोन चोरुन नेली आहे.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एम.ए.कांबळे ८८८८८६५९९७

## दि.२९/०५/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ३९४/१९,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेअॅक्ट १८४,१३२(१)(क),११९/१७७,१७९ |
| **फिर्यादी** | तेजस भोसले, पो.कॉ. येरवडा पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२८/०५/२०१९ रोजी १९/३० वा. सादल बाबा दर्ग्या समोरील रोडवर सादर बाबा चौक, येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी रमेश यादव साठे,वय-६०,रा.गोकुळनगर,शिवाजीनगर जेल रोड,नाशिक यांस जबर ठोस मारून,गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.व्हि.बोबडे ९८२३०७९५९३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडकी पो स्टे २००/१९,भादविक ४३६ |
| **फिर्यादी** | सुमित आढाव,वय-३३,रा.पीएमसी कॉलनी,वाकडेवाडी,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०५/२०१९ रोजी पहाटे ०१/३० वा. फिर्यादीचे राहते घरासमोर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांची मोटार सायकल ही राहते घरासमोर लॉक करून पार्क केली असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने,अज्ञात कारणावरून मोटार सायकलवर प्लॅस्टिकचे बाटलीत पेट्रोलसारखे ज्वलनशील पदार्थ टाकुन,दुचाकी जाळुन नुकसान केले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. पी.एस.देवकर ९५९४९८४२९१ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**